सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता महत्वाचे रस्ता/रेल्वे / कालवे दुतर्फा वृक्ष लागवड (४४०६ ०४९२) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.१६७/फ-११**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**दिनांक : १८ मार्च, २०१९**

**<u>वाचा</u> :-**

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. साववि-२०१८/ प्र.क्र. ७८/ फ-११, दि. ०२.०७.२०१८
३) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष -१/यो/ नबाप्र/प्र.क्र.१९/२०१८-१९/१३३८, दि. ३१.१०.२०१८ व क्रमांक १७१६ दि. २७.१२.२०१८.
४) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. साववि-२०१८/ प्र.क्र. ७८/ फ-११, दि. ०६.११.२०१८
५) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष -१/यो/ नबाप्र/प्र.क्र.१९/२०१८-१९/१६००, दि. ११.१२.२०१८
६) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. साववि-२०१८/ प्र.क्र. ७८/ फ-११, दि. ०२.०१.२०१९
७) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. पूरक -२०१८/ प्र.क्र.१६७ / फ-११, दि. २७.०२.२०१९
८) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४२/ अर्थ-३, दिनांक ८.मार्च २०१९
९) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्र. बीयुडी-२०१९/ ४४०६/ प्र.क्र. २६/ब-१, दि. ८मार्च २०१९

**<u>प्रस्तावना</u> :-**

वन आणि वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता राज्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ करीता **"सामूहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम (४४०६ ०४९२)"** या योजनेंतर्गत प्राप्त अनुदानाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण (४४०६ ०४९२) | मूळ तरतूद रक्कम (रुपये लाखात) | पुरवणी मागणी जुलै/ नोव्हेंबर २०१८ | सुधरित अंदाज २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| १ | वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम | ३०१३५.०० | २७४६०.०० | ५७५९५.०० |
| २. | महत्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणऱ्या टेकडयांचे हरितीकरण | ६१०.०० | - | ६१०.०० |
| **३.** | **महत्वाचे रस्ते/ रेल्वे / कालवे यांचे दुतर्फा वृक्ष लागवड** | **३६२५५.००** | **१२५००.००** | **४८७५५.००** |
| | **एकूण** | **६७०००.००** | **३९९६०.००** | **१०६९६०.००** |

२. त्यापैकी महत्वाचे रस्ता/रेल्वे / कालवे दुतर्फा वृक्ष लागवड करणेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात संदर्भ क्र.९ येथील शासन ज्ञापन दि.०८.०३.२०१९ अन्वये परि.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित अंदाज रु.४८,७५५.०० लक्ष मंजूर केले आहेत. त्यापैकी आतापर्यंत रु.३६२५५.०० लक्ष निधी खाली नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला असून रु. १२५००.०० लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

| अ.क्र. | शासन निर्णय | रक्कम ( रुपये लाखात ) |
|---|---|---|
| १ | ०२.०७.२०१८ | ६२६७.२७ |
| २ | ०६.११.२०१८ | ६२६७.२७ |
| ३ | ०२.०१.२०१९ | १२५३४.५४ |
| ४ | २७.०२.२०१९ | ११११८५.९२ |
| | **एकूण** | **३६२५५.००** |

३. वरील योजनेसाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,( अर्थसंकल्प, नियोजन व विकास ), नागपूर यांनी संदर्भ क्र.५ येथील पत्र दि.११.१२.२०१८ नुसार पूर्व पावसाळी कामांकरिता मागणी केल्यानुसार रु. १७१४९.१३ लक्ष निधी पैकी संदर्भ क्र. ७ येथील शासन निर्णय दि. २७.०२.२०१९ अन्वये वितरित रु. १११८५.९२ लक्ष निधी वगळता उर्वरित ५९६३.२१ लक्ष निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरिता सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या "महत्वाचे रस्ते/ कालवे/रेल्वे लाइनच्या दुतर्फा वृक्ष लागवड करणे (४४०६ ०४९२) " हया योजनेकरिता प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार **रु.५९६३.२१ लक्ष निधी मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. वितरित करुन घेतलेला निधी मंडळे/ महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

**४. ज्या प्रकरणी वन परिक्षेत्र अधिकारी/ सहायक वन संरक्षक यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराबाहेर तांत्रिक /प्रशासकीय मान्यता दिली आहे, अशा प्रकरणी सक्षम अधिकाऱ्यांनी सुधारित तांत्रिक/ प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे, याबाबत खातरजमा करुनच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) , नागपूर व प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांनी सदर निधी वितरीत करावा.**

**५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) हे तांत्रिक व्र प्रशासकीय मंजूरीच्या अनुषंगाने झालेल्या अनियमिततेस जबाबदार सबंधितांविरुध्द आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करतील या अटीच्या अधीन राहून वरील निधी वितरित करण्यात येत आहे.**

६. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

७. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनाक ०२.०४.२०१८ परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून खर्ची टाकण्यात यावा.

**मागणी क्र. सी-१०**

**४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च**

**(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण अंतर्गत**

**महत्वाचे रस्ते/कालवे/रेल्वे लाईनच्या दुतर्फा वृक्ष लागवड (४४०६ ०४९२)**

**०२- मजूरी , २१- सामुग्री पुरवठा**

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ , दि. २५.०१.२०१९ तसेच महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्र. बीयुडी-२०१९/ ४४०६/ प्र.क्र. २६/ब-१, दि. ८मार्च २०१९ व वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४२/ अर्थ-३, दिनांक ८मार्च,२०१९ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१८१६००४१३३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a6498 6631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.03.18 16:03:20 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, ( मंत्रालय )**

**प्रत,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख ),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक ( प्रादेशिक ) (११ वृत्त )
५. वनसंरक्षक , सामाजिक वनीकरण ( ६ वृत्त )
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण ( सर्व जिल्हे )
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.

------